औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाची शुक्रवार दिनांक ४.६.९३ रोजी झालेल्या ८२ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत.

=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=

बैठकीस खालील पदाधिकारी उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १] श्री. ईश्वर भोसीकर | सभापती/औरंगाबाद मंडळ. |
| २] श्री. भास्कर मुंढे | उपसभापती/औरंगाबाद मंडळ. |
| ३] श्री. राजभोज<br>कार्यकारी अभियंता,<br>म. न. पा. औरंगाबाद.<br>[आयुक्त म. न. पा. औ, बाद<br>यांचे ] | सदस्य प्रतिनिधी. |
| ४] श्री. स. ह. देशपांडे<br>[उपसंचालक नगररचना औरंगाबाद<br>यांचे ] | सदस्य प्रतिनिधी. |

विषय क्रं. १: दिनांक ८.४.१९९३ रोजी झालेल्या ८१ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करणेबाबत.

ठराव क्रं. ४८७

दिनांक ८.४.१९९३ रोजी झालेल्या ८१ व्या बैठकीच्या कार्यवृत्तांतावर सविस्तर चर्चा होऊन ८१ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करण्यांत आला.

विषय क्रं. २: सिटी सर्व्हे क्रं. १८३४८ औरंगाबाद या जमिनीबाबत.

ठराव क्रं. ४८८

या विषयावर नगरपालिकेने मंजूर केलेले लेआऊट पाहून व न्यायालईन प्रकरणांचा अभ्यास करून निर्णय घ्यावा लागेल असे मा. सभापती यांनी सांगितले व हा विषय तहकुब ठेवावा असे प्रतिपादन केले. यावर सर्वांनी संमती दिली व विषय तहकुब ठेवणेचे ठरले.

विषय क्रं. ३: महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाच्या कार्यालयासाठी औरंगाबाद मंडळातर्फे अतिरिक्त जागा उपलब्ध करुन देण्याबाबत.

---

या विषयावर चर्चा करतांना उपसभातींनी मंडळास माहिती दिली की, मंडळाचे कार्यालय नविन प्रशासकीय इमारतीमध्ये स्थलांतरीत होणार आहे व मध्याची जागा ही रिकामी होणार आहे व या जागेची मागणी महाराष्ट्र प्रशासकीय न्याधिकरणाच्या कार्यालयासाठी अतिरिक्त जागा द्यावी म्हणून मागणी केलेली आहे.

यावर मंडळाच्या सदस्यांनी महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणास रिकामे होणारे मंडळाचे कार्यालय हे १२ महिन्याच्या करारावर देण्यास संमती दिली.

<u>ठराव क्रं. ४८९</u>

या विषयावर सविस्तर चर्चा होऊन जागेचे वाटप खालील अटीवर करण्याचे ठरले.

१] ती जागा अतिरिक्त म्हणून उपलब्ध करुन देण्यांत येणार असल्यामुळे त्यासाठी न्यायाधिकरणास वेगळे भाडे मंडळ ठरवेल त्याप्रमाणे द्यावे लागेल.

२] जागा ज्या स्थितीत आहे त्या स्थितीत न्यायाधिकरणास ताब्यात घ्यावी लागेल. त्यामध्येकोणताही बदल किंवा दुरुस्ती मंडळ करुन देणार नाही.

३] जागेचे वाटप तात्पुरत्या कालावधीसाठी म्हणजेच वाटप केल्यास फक्त १२ महिन्यासाठी करण्यांत येईल व त्या नंतर न्यायाधिकरणास ही जागा तात्काळ खाली करुन द्यावी लागेल.

४] वाटपाच्या इतर सर्वसाधारण अटी न्यायाधिकरणास बंधनकारक राहतील.

विषय क्रं. ४: मौजे म्हाळजा नांदेड येथील ६० गाळे अल्प उत्पन्न गट या योजनेतील २० गाळे खादी ग्रामोद्योगास देण्याबाबत.

---

<u>ठराव क्रं. ४९०</u>

या विषयावर सविस्तर चर्चा होऊन मंडळाने खालील प्रमाणे निर्णय घेतला.

अ]. २० गाळे सलग वाटप करण्यांत यावे.

ब]. गाळे क्रमांक २२७ व २४८ आणि २९२ ते ३११ खादी ग्रामोद्योग मंडळास अतिरिक्त वाटपासाठी राखीव ठेवावे.

क]. खादी ग्रामोद्योग मंडळाकडे येणे असलेली रक्कम रू. ३,८०,०००/- वार्षिक हप्त्यास ८.०५% व्याजाच्या दराने वसूल करावी.

विषय क्र. ५:- एन-५ व एन-६ सिडको नवीन औरंगाबाद येथील मंडळाच्या वसाहतीबाबत.

ठराव क्र.: ४९१:

या विषयावर सविस्तर चर्चा होऊन मंडळाने असा निर्णय घेतला की, एन-५ व एन-६ सिडको या वसाहतीतील साचलेल्या कच-याची विल्हेवाट लावण्यासाठी व पावसाळ्यात व इतर वेळी सुध्दा निर्माण होणारा मलनि:सारणाचा प्रश्न इ., बाबींची पुर्तता करण्याकरिता गाळेधारकांकडून सेवा शुल्क म्हणून प्रति महा रू. १०/- वसूल करावे. हे शुल्क पाणीपट्टीसाठी आकारण्यांत येत असलेल्या शुल्कापेक्षा अतिरीक्त राहील.

विषय:- क्र. ६:- मा. सभापतीच्या परवानगीने आयत्यावेळेस येणारे विषय.

१]. औरंगाबाद मंडळाच्या नविन प्रशासकीय इमारतीसाठी फर्निचर खरेदी करणेबाबत.

नविन प्रशासकीय इमारतीत फर्निचर खरेदी करण्याच्या प्रस्ताव मा. सभापती श्री. ईश्वरराव भोसीकर, यांनी मांडला व त्यावर चर्चा करतांना मा. सभापतींनी सूचना केली.

महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण या कार्यालयाने मंडळाचे रिक्त होणारे कार्यालय हे फर्निचरसह मागितलेले आहे त त्यांना देण्यांत यावे व नविन प्रशासकीय इमारतीसाठी नविन फर्निचर घेण्यांत यावे. यापुढे मा. सभापतींनी असे सांगितले की, मंडळाच्या नविन प्रशासकीय इमारतीचे

उद्घाटन हे लवकरच होणार आहे. त्यासाठी नविन प्रशासकीय इमारतीसाठी लागणारे फर्निचर खरेदी करण्यांत यावे.

यावर उप-सभापतींनी सांगितले की, सध्या मंडळाच्या कार्यालयात जे फर्निचर आहे ते मोडकळीस आलेले आहे. नवीन इमारतीमध्ये नेण्यासारखे नाही व योगायोगाने महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाने मंडळाचे [गोडाऊन ] कार्यालय हे फर्निचरसह भाड्याने मागितलेले आहे. ते त्यांना देण्यांत यावे.

या प्रस्तावास मंडळाच्या उपस्थित सदस्यांनी संमती दर्शविली व अंदाजे रु. ५.०० लाख खर्च करावे त्यासाठी अंदाज पत्रकात तरतुद करून द्यावी असे ठरले.

ठराव क्र. : ४९२ :
---

या विषयावर चर्चा होऊन सर्वानुमते असा निर्णय घेण्यांत आला की, अंदाजे रु. ५.०० लाखापर्यंत मंडळाच्या नवीन प्रशासकीय इमारतीसाठी नविन फर्निचर खरेदी करण्यांत यावे. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणांस फर्निचरसह सध्याचे कार्यालय [गोडाऊन] भाड्याने देण्यांत यावे.

सर्व उपस्थितांचे आभार मानून सभा संपली.

........